महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ६४ वे | दिनांक : २४/०२/२०२६ | वार : मंगळवार

## ५० टक्के आरक्षण ओलांडलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका लांबणीवर



**मुंबई :** महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील ओबीसी आरक्षणावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. त्यानुसार राज्यातील ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने मनाई केली आहे. राज्यात आता २२ जिल्हा परिषद आणि त्याअंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित राहणार आहेत.

सर्वोच्च न्यायालयात पार पडलेल्या सुनावणीत अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रलंबित निवडणूक घेण्यास परवानगी देण्याची मागणी राज्य सरकारकडून करण्यात आली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने उर्वरित जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्यास मनाई केली आहे.

राहुल रमेश वाघ विरुद्ध केंद्र आणि महाराष्ट्र सरकार या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने बांठिया समितीपूर्वीच्या स्थितीनुसार निवडणुका घेण्याचे आदेश दिले होते. मात्र राज्य निवडणूक आयोगाने आरक्षणाची ५० टक्क्यांची कायदेशीर मर्यादा ओलांडल्याने २२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुकांना स्थगिती देण्यात आली आहे. सद्यस्थितीत १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका पार पडल्या असल्या, तरी आरक्षणाच्या या तांत्रिक पेचामुळे उर्वरित २२ जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका आता अनिश्चित काळासाठी प्रलंबित राहण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

राज्यातील ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली गेली आहे, त्या ठिकाणच्या निवडणुकांवरील स्थगिती सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवली आहे. राज्य सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी 'अंतिम आदेशाच्या अधीन राहून' या निवडणुका घेण्याची परवानगी मागितली होती. मात्र, तांत्रिक गुंतागुंत पाहता सर्वोच्च न्यायालयाने अशी कोणतीही परवानगी देण्यास स्पष्ट नकार दिला आहे.

या न्यायालयीन भूमिकेमुळे राज्यातील प्रलंबित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आता अनिश्चित काळासाठी लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जोपर्यंत आरक्षणाच्या मर्यादेबाबत कायदेशीर स्पष्टता येत नाही, तोपर्यंत निवडणूक प्रक्रिया पुढे नेण्यास न्यायालयाने हिरवा कंदील दाखवलेला नाही. परिणामी, अनेक जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांचे भवितव्य सध्या अधांतरी आहे.

दुसरीकडे, बांठिया आयोगाने शिफारस केलेल्या ओबीसी आरक्षणाच्या वैधतेवर सर्वोच्च न्यायालय लवकरच अंतिम सुनावणी सुरू करणार आहे. न्यायालयाने सर्व संबंधित वकिलांना या सुनावणीसाठीची पूर्वतयारी पूर्ण करण्याचे निर्देश दिले असून, ही सुनावणी लवकर घेण्याचे संकेत दिले आहेत. या अंतिम निकालावरच राज्यातील ओबीसींचे राजकीय आरक्षण आणि रखडलेल्या निवडणुकांचा मार्ग अवलंबून असेल.

## भागवत कराड यांच्यावर गंभीर आरोप

**छत्रपती संभाजीनगर :** भाजप नेते तथा माजी मंत्री भागवत कराड यांनी आपल्या मुलाच्या अवघ्या १ वर्ष जुन्या कंपनीला एक-दोन नव्हे तर तब्बल ४७०० कोटींचे कंत्राट मिळवून दिल्याचा खळबळजनक आरोप सामाजिक कार्यकर्त्या जयश्री खाडिलकर यांनी केला आहे. हे कंत्राट जायकवाडी धरणावरील तरंगत्या सौर ऊर्जा प्रकल्पाशी संबंधित आहे. स्वतः कराड यांनी आपल्या मुलामुळेच गुजरातला जाणारा हा प्रकल्प महाराष्ट्राला मिळाला असल्याचे मान्य केले आहे, असे खाडिलकर यांनी म्हटले आहे.

माजी अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी जायकवाडी धरणाच्या पाण्यावर सौरपटल उभारून १,३४१ मेगावॉट वीजनिर्मिती करणाऱ्या प्रकल्पाचे जोरदार समर्थन केले होते. कराड यांचे सुपुत्र वरुण हे 'एलएनके ग्रीन एनर्जी प्रा. लि.' कंपनीत भागीदार आहेत. या कंपनीने महाराष्ट्रात सौरपटल निर्मिती क्षेत्रात ४७०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यासाठी महाराष्ट्र सरकारशी करार केला आहे. दावोस येथे पार पडलेल्या आर्थिक परिषदेत करण्यात आलेल्या या करारामुळे २५०० जणांना रोजगार मिळणार आहे. आता या कंपनीला शेंद्रा औद्योगिक वसाहतीत ६३ एकर जागा देण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. या प्रकरणी उलटसुलट चर्चा सुरू असताना जयश्री खाडिलकर यांनी उपरोक्त आरोप केला आहे.

जयश्री खाडिलकर या प्रकरणी आपल्या एका पोस्टमध्ये म्हणाल्या, भाजपने भागवत कराड यांना अचानक खासदार म्हणून राज्यसभेवर पाठवले. का पाठवले? तर पंकजा मुंडे यांचा दबाव वाढत होता. त्यांचे बळ वाढत होते. त्यामुळे त्यांच्यापुढे कुणीतरी नेता उभा करायचा म्हणून भागवत कराड यांना प्रमोट करण्यात आले. त्यानंतर त्यांना थेट मंत्रिपदही देण्यात आले. भागवत कराड केंद्रात राज्यमंत्री असताना त्यांना विजेशी संबंधित एका समितीवर घेण्यात आले. आता ते खासदार किंवा मंत्री नाहीत. पण अलीकडेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात एक शिष्टमंडळ दावोसच्या दौऱ्यावर गेले होते. त्या शिष्टमंडळाने तिथे एलएनके ग्रीन या कंपनीशी करार केला.

हा करार तब्बल ४७०० कोटींचा आहे. या करारांतर्गत जायकवाडी धरणावर तरंगते सौर पॅनल बसवण्यात येणार आहेत. ही कंपनी भागवत कराड यांचे सुपुत्र वरुण कराड यांची आहे. भागवत कराड यांच्या मते, हे कंत्राट गुजरातला जाणार होते. पण एलएनके ग्रीन कंपनीत माझा मुलगा असल्यामुळे ते कंत्राट महाराष्ट्राला मिळाले. हे त्यांनी खुलेपणाने सांगितले, असे खाडिलकर म्हणाल्या.

## सभागृहात बोलताना अदिती तटकरेंना अश्रू अनावर : अजितदादांच्या आठवणींना दिला उजाळा



**मुंबई :** अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून सुरू झाले. पहिल्या दिवशी सर्वच नेत्यांनी सभागृहात दिवंगत अजित पवारांच्या आठवणींना उजाळा दिला. राष्ट्रवादीचे सर्वच नेते यावेळी भावुक झाल्याचे पाहायला मिळाले. मंत्री अदिती तटकरे यांना देखील अश्रू अनावर झाले होते. अदिती तटकरे यांनी अजितदादांच्या अनेक आठवणी यावेळी सभागृहात बोलताना सांगितल्या.

अदिती तटकरे म्हणाल्या, अजितदादांना जाऊन महिना होत आला. कुठेतरी आम्हाला सगळ्यांना वाटायचे की ते आमच्यामध्ये असतील. पण तो भ्रम आज या सभागृहाचे कामकाज सुरू होताना तुटला. या सभागृहावर त्यांचे प्रचंड प्रेम होते. आज या सभागृहात ज्यावेळेला त्यांच्या खुर्चीवर त्यांना बघितले नाही, त्यावेळेला ही वस्तुस्थिती मान्य करून आपल्याला आपल्या नेत्याच्या शिवाय आयुष्य जगावे लागेल हे दुर्दैवाने आज बोलावे लागत आहे, असे म्हणताना अदिती तटकरे यांचा कंठ दाटून आल्याचे पाहायला मिळाले.

पुढे बोलताना अदिती तटकरे म्हणाल्या, मी १२ वर्षांची होते जेव्हा मी पहिल्यांदा दादांना भेटले. ९९ साली राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची स्थापना झाली. माझे वडील तेव्हा आमदार होते. मनोरेच्या ज्याला आपण नवीन आमदार निवास म्हणायचो, तिथल्या १३ व्या मजल्यावर त्यांची खोली होती. तेव्हा माझी पहिल्यांदा भेट झाली. त्यानंतर अनेकदा भेट होत गेल्या. आदरणीय पवार साहेबांचा आणि दादांचा प्रवास पाहण्याची संधी जवळून पाहायला मिळाली. त्यावेळेला दादांच्या जवळ जायला एक प्रकारची भीती वाटायची, एक धाक असायचा त्यांचा.

अजितदादांचा जनता दरबार सकाळी पावणे सात वाजता सुरू व्हायचा. ६.३० वाजता ते पक्षाच्या कार्यालयात यायचे. मला राष्ट्रवादी युवती कॉंग्रेसचे संघटन पद ज्यावेळी मिळाले, त्या पदाचे नियुक्ती पत्र मला सकाळी ७ वाजून १० मिनिटांनी त्यांच्या हस्ते मिळाले होते. तेव्हा पासून त्यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली. २०१९ साली मी या सभागृहात आले. या सभागृहात कामकाज कसे करावे हे मी दादांकडून शिकले. बजेट पुरवणीच्या मागण्यावर आपण कसे बोलायचे, भाग क्रमांक, पान क्रमांक याचा उल्लेख आधी करायचा. या सगळ्या बारीक-सारिक गोष्टी या त्यांनी आम्हाला शिकवल्या. त्यावेळेला आम्ही सगळे तरुण पहिल्यांदा आमदार म्हणून निवडून आलो होतो. तेव्हा नागपूरचे अधिवेशन सुरू होते. आमच्या सगळ्यांना दादा लॉबीमध्ये घेऊन बसले होते. रात्री ११-१२ वाजता आम्हाला बोलायची संधी मिळायची. आमच्या सगळ्यांचे बोलणे होईपर्यंत ते इथे बसून राहायचे. त्यांना विचारले जायचे दादा तुम्ही गेला नाहीत? तेव्हा ते म्हणायचे, नाही माझे मुलं अजून बोलत आहेत, अशी आठवण तटकरे यांनी यावेळी सांगितली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २४ फेब्रुवारी २०२६

## साहित्योत्सवात 'पुत्रैषणा' कथेचा गौरव; बापुराव वऱ्हाडेंना तृतीय पारितोषिक




**छत्रपती संभाजीनगर** : साहित्योत्सव म्हणजे केवळ कार्यक्रमांची मालिका नाही; तो नवोदित लेखकांचा, नवसाहित्यिकांचा आणि युवा प्रतिभांचा आत्मविश्वास दृढ करणारा प्रेरणास्रोत आहे. हा उद्देश मनात ठेवून छत्रपती संभाजीनगर शहरात, साहित्य भारती देवगिरी प्रांत आणि सरस्वती भुवन शिक्षण संस्थेतर्फे २०, २१ आणि २२ फेब्रुवारी २०२६ रोजी हा साहित्योत्सव आयोजित करण्यात आला होता. या साहित्योत्सवात निबंध लेखन, कविता वाचन, नाट्यछटा, पथनाट्य आणि कथालेखन अशा अनेक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा विद्यार्थी गट आणि खुला गट अशी दोन विभागात झाली. यामध्ये खुल्या गटातून बापुराव वऱ्हाडे यांच्या 'पुत्रैषणा' या कथेला तृतीय पारितोषिक मिळाले. त्याबद्दल त्यांचा रोख रक्कम दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी विचार मंचावर साहित्योत्सवाच्या स्वागताध्यक्ष, (इतर मागास बहुजन कल्याण व दुग्धविकास मंत्री) अतुल सावे, कार्याध्यक्ष म्हणून ( छत्रपती संभाजीगर शहरातील ज्येष्ठ उद्योजक विकास कापरे, सरस्वती भुवनचे अध्यक्ष ॲड. दिनेश वकील, उपाध्यक्ष, प्रसाद शेरकर कोषाध्यक्ष, सुरेश जगाडे साहित्योत्सवाचे निमंत्रक प्रा. डॉ. सर्जेराव जिगे, कार्यवाह डॉ. आर्कि. अनिरुद्ध नाईक, साहित्य भारतीचे प्रांत अध्यक्ष प्राचार्य संजीव गिरासे, कार्याध्यक्ष उमेश काळे यांची उपस्थिती होती.

## जेईएस महाविद्यालयात राष्ट्रसंत गाडगेबाबा जयंती साजरी



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** : जेइएस महाविद्यालय जालना येथे राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना, राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे, प्रा. अरविंद महाजन, श्री अनिल इंगळे, श्री हनुमान बागडे, प्रा. जगदीश मुळे, प्रा राहुल सारस्वत, श्रीमती अदिती नाईक श्री राठोड आदी उपस्थित होते.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002

# शाळा विकसित करताना

मराठी माध्यमांच्या शाळांची सध्याची स्थिती फारच बिकट आहे. विद्यार्थी संख्ये अभावी त्या बंद होत चालल्या आहेत. अशा परिस्थितीत त्या टिकवणे, वाढवणे आणि विकसित करणे म्हणजे एक मोठे दिव्य. त्या दिव्यत्वाचा छोटा शोध म्हणजे हा लेख. 30 - 40 वर्षांपूर्वी मराठी शाळांमध्ये एक - एक वर्गाच्या सहा - सहा तुकड्या होत्या. प्रत्येक वर्गात 60 ते 70 विद्यार्थी असत. काळ असा बदलला की, आज त्या ठिकाणी एका वर्गाची एकच तुकडी राहिली असून, त्यातही ओढून ताणून कसेबसे 25 - 30 मुलं दिसतात. याबद्दल आपण हळहळ व्यक्त करतो. पण आपल्याला त्याची लाज वाटत नाही. अभिजात दर्जा प्राप्त झालेली मराठी भाषा वाचवायची असेल तर या शाळा पुन्हा भरल्या पाहिजेत. नाहीतर पुढच्या पिढ्या आपल्याला माफ करणार नाहीत. हे काम कोणी करावे? तर दुसरा तिसरा नाही स्वतःपासूनच सुरुवात करावी लागेल. हे प्रत्येकाला करावे लागेल. खरं तर एका वेगळ्या अर्थाने आपण सर्वच याबद्दल गाफील राहिलो, लक्षच दिलं नाही. जे इतिहासात आपल्याबद्दल सातत्याने घडत आले आहे. खऱ्या अर्थाने अभिजात मराठी भाषा व महाराष्ट्र धर्म टिकवायचा असेल तर आपण मराठी शाळा, मराठी वाचनालये टिकवली पाहिजेत. वाढवली पाहिजेत. केवळ मोठ्या प्रमाणात मराठी सण, उत्सव साजरे करून चालणार नाही. की जो सध्या एक ट्रेंड झाला आहे. यातून मराठी भाषा किती वाचेल याबद्दल शंकाच आहे. कारण हा सर्व भाग उत्सवापुरताच मर्यादित असतो. कधी कधी त्यात भाषाभिमानाचा आणि महाराष्ट्र धर्माचा सुद्धा अभाव दिसून येतो. याही परिस्थितीत नुकताच केवळ महाराष्ट्रात, देशात नाही तर जगात पहिल्या क्रमांकाची शाळा म्हणून येण्याचा बहुमान पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील जालिंदर नगर येथील जिल्हा परिषदेच्या शाळेने मिळवला आहे. वाबळेवाडीची शाळा जगाच्या नकाशावर घेऊन जाणाऱ्या दत्तात्रय वारे गुरुजी यांनी हे शक्य करून दाखवले आहे. त्यांच्या कार्याला मनापासून सलाम व त्रिवार अभिनंदन. मराठी शाळांसाठी ही अत्यंत अभिमानास्पद व गौरवास्पद गोष्ट. आदर्श शाळा कशी असावी म्हणून सतत शोध घेत राहणे. तो घेताना याही प्रतिकूल परिस्थितीत उत्तम कामगिरी करत विद्यार्थी संख्या वाढवत नेणाऱ्या वाबळेवाडी सारख्या जगमान्य आदर्श मराठी शाळांचा शोध घेऊन त्यांना भेटी देणं आपल्याला सहज शक्य आहे. आपल्याकडे काय कमी आहे आणि त्यांच्याकडे असलेले उत्तम आपल्या शाळेत कसे आणता येईल यासाठी प्रयत्न करणे, इतर शाळांमध्ये होत असलेल्या चांगल्या उपक्रमांची, त्यांनी ते कसे केले त्याबद्दलची माहिती घेणे व त्याची आपल्या शाळेत अंमलबजावणी करणे. शाळाशाळांमध्ये विविध प्रकारच्या निकोप स्पर्धा, शिक्षकांमध्ये सर्व विषयांच्या निकालासाठी निकोप स्पर्धा, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण गुणवत्तेबद्दल सुद्धा निकोप स्पर्धा ठेवता येईल. "शांततेच्या काळात जास्त घाम गाळला तर युद्धाच्या काळात कमी रक्त सांडावे लागते" यावर अधिक काम करणे आवश्यक. वर्षभराचे नियोजन सुट्टीत तयार करून ठेवले असेल तर वर्षभर त्यावर काम करत राहणे सोपे जाते. कामाचे नियोजन असल्याने काही कामे अचानक आली तरी टेन्शन येत नाही. त्यामुळे शाळेची सर्व कामे वेळेत होतात. अधिक ॲडमिशन साठी शाळा सुरू झाल्यानंतर प्रयत्न करण्यापेक्षा शाळा सुरू होण्यापूर्वी मेहनत घेणे जास्त योग्य ठरेल. शाळेत होणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी प्रमुख पाहुणे म्हणून स्थानिक परिसरातील शैक्षणिक, सामाजिक, शाळेची गरज वाटल्यास राजकीय क्षेत्रातील मान्यवर, गावातील प्रतिष्ठित, ग्रामसेवक, सरपंच, नगरसेवक, शासकीय अधिकारी यासारख्या व्यक्तींना बोलावल्यास स्थानिक परिसरात शाळेबद्दल सकारात्मक संदेश जातो. अध्यापनाची नवीन पद्धत स्वीकारणे. त्यामध्ये विद्यार्थ्यांना आव्हान देणे, यशस्वी विद्यार्थ्यांसोबत सेल्फी काढणे, ती विविध समाज माध्यमांमध्ये व्हायरल करणे. विद्यार्थ्यांना त्यांच्या मित्रांकडून शिकण्यास प्रोत्साहन देणे. कारण विद्यार्थी हे शिक्षकांकडून जितके शिकतात त्याहून जास्त आपल्या मित्रांकडून शिकतात. यामुळे त्यांची शिक्षणाची गती वाढते. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास करणे, श्रद्धा, अंधश्रद्धा, विश्वास व चिकित्सक वृत्ती यातील फरक समजावून सांगणे. विद्यार्थ्यांना विविध शालेय स्पर्धा, आंतरशालेय स्पर्धा, तालुका, जिल्हा, राज्यस्तरीय विविध स्पर्धांमध्ये भाग घेण्यास प्रोत्साहन देणे. विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश हे शाळेचे यश असते. त्याचा अंगीकार किंवा स्वीकार करत त्याला प्रसार माध्यमातून विविध पद्धतीने व्हायरल करणे. यामुळे विद्यार्थी, त्याचे पालक व त्या संबंधित इतर सर्व घटक सुखावतात. त्यामुळे शाळेचा प्रचार प्रसार करण्यात मोलाची भर पडते. विद्यार्थ्यांना अंतरविद्याशाखीय विषयांचा अभ्यास करण्यास सांगणे म्हणजे प्रत्येक विषय हा दुसऱ्या विषयाशी कोणत्या ना कोणत्या रूपात जुळलेला असतो. विद्यार्थ्यांना सृजनशीलतेचा स्वीकार व सर्जनशीलतेचा अंगीकार करण्यास सांगणे.

यातूनच भविष्यामध्ये मातृभाषेतून शिक्षण घेण्याचे कृतीयुक्त महत्त्व सर्वमान्य होण्यास मदत होईल. या राष्ट्राचे आराध्य छत्रपती शिवाजी महाराजांनी सुद्धा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये हिंदवी स्वराज्य उभे केले. आपण त्यांचेच मावळे आहोत हे कदापि विसरता कामा नये. धन्यवाद.

**लेखक प्रा. श्री. प्रशांत पुंडलिक शिरुडे**
**के. रा. कोतकर**
माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय डोंबिवली
9967817876prashantshirude1674@gmail.com

## जाहिरात दर

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-
२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-
३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-
४. शुभेच्छा जाहिरात ६००/-

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २४ फेब्रुवारी २०२६


# भगवान विद्यालयात संत गाडगेबाबा जयंती निमित्त स्वच्छता मोहीम




**आडगाव बु:** येथील भगवान विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय आडगाव बुद्रुक येथे संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त स्वच्छता मोहीम राबविण्यात आली या मोहिमेत इयत्ता पाचवी ते नववी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन शालेय मैदान व मेन रोड आडगाव येथील परिसर विद्यार्थी व शिक्षक यांनी हातात झाडू खराटे घेऊन स्वच्छ केला त्यामुळे स्वच्छतेचे महत्त्व व संत गाडगेबाबांचे कार्य व समाजासाठी दिलेले योगदान याबद्दल विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली. विद्यालयाचे प्राचार्य संजय देसले तसेच शिक्षक राजेंद्र पगारे देविदास शिरसाठ बाबासाहेब बडधे ऋषिकेश चाथे छाया कणसे मनोहर विटकर सुनील बनसोडे संगीता पाटील यांनीही स्वच्छता मोहिमेत आपले योगदान दिले.

# श्रीकृष्ण महाविद्यालयात गाडगेबाबा यांची जयंती साजरी



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे)** : तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्या वतीने संत गाडगे महाराज यांची शतकोत्तर जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. यावेळी अध्यक्ष म्हणून व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड , प्रमुख वक्ते प्रा. डॉ.आर.एन.निगडे,प्रा. डॉ.रामकृष्ण कदम हे उपस्थित होते. संत गाडगे महाराज हे सर्वसामान्य माणसाच्या प्रश्नांना वाचा फोडत असून , श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील फरक लोकांना समजून सांगत असत. देव दगडात नसून माणसात आहे. माणूस हाच सर्वश्रेष्ठ आहे असे सातत्याने सांगितले. प्रा.राजाराम निगडे यांनी संत गाडगे महाराजांचे एकूणच आयुष्य आणि जीवन उलगडून दाखवले. प्रारंभी प्रमुख पाहुणे आणि प्रमुख उपस्थितांच्या वतीन संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून वंदन करण्यात आले. ते पुढे म्हणाले की,स्वच्छता हाच संत गाडगे महाराज यांचा जीव की प्राण होता.अनेक सार्वजनिक ठिकाणे ते नित्यनेमाने स्वच्छ करत असत. समाजातील अंधश्रद्धा आणि आज्ञन दूर करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर खस्ता खाल्ला. पुरोगामी विचार हाच त्यांचा आचार होता. बाहेरच्या घाणीबरोबर मनातील घाणही संत गाडगे महाराज स्वच्छ करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. समाजसेवा हेच त्यांचे वृत् होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, व प्रास्ताविक प्रा. डॉ. विनोद धनेराव यांनी केले. आभार प्रा. डॉ. उमाकांत सूर्यवंशी यांनी व्यक्त केले.

## संत गाडगेबाबा

कर्मयोगी संत । होते बाबा तुम्ही ।
दंग झालो आम्ही । संसारात ।।१।।

घेऊनी खराटा । गाव स्वच्छ केले ।
किर्तनाने झाले । प्रबोधन ।।२।।

विद्येचे महत्त्व । पटवून दिले ।
सदोदित केले । जागरण ।।३।।

नाही माय-बापा । देव दगडात ।
पहा माणसात । सांगितले ।।४।।

जेवणाचे ताट । प्रसंगी विकावे ।
शिक्षण शिकावे । सर्वजण ।।५।।

माणसा माणसा । करू नको भेद ।
पडणार छेद । समाजात ।।६।।

संत विचाराने । समाज जागतो ।
नागेश सांगतो । अभंगात ।।७।।



**नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर**

## सारे आलबेल

वरून दिसते! सारे आलबेल!
नाही कुठे मेळ! जगण्याचा!!

चुकलाय खेळ! पाठीवर वळ!
सोसतोय कळ! जीवघेणी!!

कशी ही माकडं! काळतोंडी जात!
व्यर्थ उतमात! वाढलेला!!

हत्तीच्या वाटेत! रोजचेच कुत्रे!
भुकण्याची सूत्रे! ठरलेली!!

धावत्या गाडीला! काळाचाच खोडा!
आयुष्याला घोडा! लागलेला!!



**ज्ञानेश्वर गायके,
कन्नड**

## विज्ञानाचे योगदान

रोजच्या जीवनात
विज्ञानाचे योगदान
मानवाच्या कल्याणासाठी
कार्य करी महान

घड्याळीच्या काट्यावर
धावपळ आपली चालते
सकाळी कधी उठायचे
मोबाईल आपणास सांगते

अविज्ञानाला करूया आता
कायमचा टाटा
विज्ञानाची मदत घेऊन
शोधू प्रगतीच्या वाटा

विज्ञान युगात
चमत्कार घडे भारी
ए आय च्या मदतीने
सुलभता येणार सारी

इंटरनेट प्रणालीमुळे
किमया न्यारीच घडते
जगभरातील लोकांना
एकमेकाशी जोडते



**- रवींद्र चालीकवार**
मु.ता.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103

प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २४ फेब्रुवारी २०२६

# प्रा. डॉ. स्मिता अवचार : समाजशास्त्राच्या सेवाव्रतापासून ते जीवनगौरवापर्यंत



महाराष्ट्रासह भारतातील समाजशास्त्रीय परंपरेत काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की ज्यांचे कार्य केवळ विद्यापीठीय चौकटीत मर्यादित राहत नाही, तर ते समाजाच्या वैचारिक जडणघडणीचा अविभाज्य भाग बनते. अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक नाव म्हणजे प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम आहेत. समाजशास्त्र या विषयाला मानवी संवेदनशीलतेची, सामाजिक बांधिलकीची आणि शास्त्रीय काटेकोरतेची जोड देत त्यांनी जे दीर्घकालीन कार्य केले आहे, त्याची दखल घेत महाराष्ट्रातील मराठी समाजशास्त्र परिषद यांच्यातर्फे देण्यात येणारा २०२५-२६ चा जीवन गौरव पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. दि. १७-१८ फेब्रुवारी रोजी नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ संचालित, कला व वाणिज्य महाविद्यालय, सिन्नर, जि. नाशिक येथे आयोजित मराठी समाजशास्त्र परिषदेच्या ३५व्या राष्ट्रीय अधिवेशनात हा सन्मान मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. लक्ष्मणसिंग साळोक आणि भारतीय समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दीप्ती रंजन साहू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आणि महाराष्ट्रासह भारतातील समाजशास्त्र क्षेत्रात एक गौरवशाली क्षण नोंदवला गेला आहे.हा पुरस्कार केवळ एका प्राध्यापिकेच्या प्रदीर्घ सेवेला दिलेली औपचारिक मान्यता नाही, तर समाजशास्त्र या विषयाच्या सामाजिक उपयोगितेला दिलेली दाद आहे. समाजातील दुर्बल, वंचित आणि दुर्लक्षित घटकांच्या प्रश्नांना संशोधनाच्या केंद्रस्थानी ठेवून समाजशास्त्राला ‘माणसांशी जोडलेला विषय’ बनवण्याचे कार्य प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांनी आयुष्यभर केले. त्यामुळेच जीवन गौरव पुरस्कार हा त्यांच्या शैक्षणिक प्रवासाचा शेवट नसून, त्यांच्या सेवाव्रताची सार्वजनिक कबुली आहे.प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांचा शैक्षणिक प्रवास हा सातत्य, चिकाटी आणि समाजाभिमुख दृष्टिकोन यांचा सुंदर संगम आहे. एम.ए., एम.फिल., डी.एच.ई. आणि पीएच.डी. या शैक्षणिक टप्प्यांतून त्यांनी समाजशास्त्राच्या मूलभूत संकल्पना, सिद्धांत आणि संशोधन पद्धती यांचे सखोल ज्ञान प्राप्त केले. मात्र, त्यांच्या शिक्षणाचा उद्देश केवळ पदव्या मिळवणे हा कधीच नव्हता. समाज समजून घेणे, समाजातील प्रश्न ओळखणे आणि त्या प्रश्नांवर शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करणे, हा त्यांच्या अभ्यासाचा खरा गाभा राहिला.समाजशास्त्र हा विषय त्यांनी केवळ सैद्धांतिक पातळीवर न ठेवता तो समाजाशी संवाद साधणारा बनवला. सामाजिक बदल, विकास प्रक्रिया, कुटुंबसंस्था, लिंगभाव, स्त्री-पुरुष संबंध, वृद्धत्व, शहरीकरण आणि ग्रामीण वास्तव या सर्व विषयांकडे त्यांनी संवेदनशीलतेने आणि वस्तुनिष्ठतेने पाहिले. त्यामुळेच त्यांचा शैक्षणिक प्रवास हा ‘पुस्तकांतील समाज’ आणि ‘प्रत्यक्षातील समाज’ यांच्यातील दरी भरून काढणारा ठरतो.त्यांचे दीर्घकालीन अध्यापन कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथील समाजशास्त्र विभागाशी निगडित आहे. विद्यापीठीय प्राध्यापिका आणि विभागप्रमुख म्हणून त्यांनी पदव्युत्तर स्तरावर समाजशास्त्र विषयाचे अध्यापन केले. वर्गखोलीतील त्यांचे अध्यापन हे केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यापुरते मर्यादित नव्हते, तर विद्यार्थ्यांमध्ये समाजाकडे पाहण्याची चिकित्सक दृष्टी निर्माण करणारे होते. सामाजिक घटनांचे विश्लेषण, प्रत्यक्ष उदाहरणे, क्षेत्रकार्याचे अनुभव आणि संशोधनातील शिस्त या सर्वांचा समन्वय त्यांच्या अध्यापनात दिसून येतो.समाजशास्त्र शिकवताना त्यांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारायला, निरीक्षण करायला आणि निष्कर्ष काढायला शिकवले. ‘समाजशास्त्र म्हणजे केवळ उत्तरांचा संच नव्हे, तर प्रश्न विचारण्याची शिस्त आहे,’ ही भूमिका त्यांच्या अध्यापनातून सातत्याने व्यक्त होत राहिली. त्यामुळेच त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये केवळ परीक्षाभिमुख तयारी नव्हे, तर संशोधनाभिमुख विचारसरणी विकसित झाली.अध्यापनाबरोबरच संशोधन हे प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांच्या शैक्षणिक जीवनाचे मुख्य केंद्र राहिले. समाजशास्त्रीय संशोधन पद्धती, विकासाचे समाजशास्त्र, लिंगभाव आणि समाज तसेच वृद्धत्वाचे समाजशास्त्र ही त्यांची विशेष अभ्यासक्षेत्रे आहेत. या क्षेत्रांतील त्यांचे संशोधन केवळ सैद्धांतिक न राहता प्रत्यक्ष सामाजिक वास्तवाशी घट्ट जोडलेले आहे. कौटुंबिक बदल, शहरीकरण, औद्योगिकीकरण, महिलांचे सक्षमीकरण, वृद्धांचे प्रश्न, कौटुंबिक हिंसाचार आणि दारूबंदी चळवळ यांसारख्या विषयांवर त्यांनी केलेले संशोधन समाजातील बदलत्या प्रक्रिया स्पष्ट करणारे ठरत आहे.विकासाचे समाजशास्त्र या क्षेत्रात त्यांनी विकास प्रक्रियेचा मानवी पैलू अधोरेखित केला. विकास म्हणजे केवळ आर्थिक वाढ नसून सामाजिक न्याय, समान संधी आणि मानवी सन्मान यांचा समतोल असावा, ही भूमिका त्यांनी सातत्याने मांडली. ग्रामीण आणि शहरी समाजातील विकासातील तफावत, स्वयं-सहायता गटांचे सामाजिक परिणाम आणि महिलांचे सक्षमीकरण यावरील त्यांच्या संशोधनातून विकासाच्या संकल्पनेला व्यापक अर्थ प्राप्त झाला आहे.लिंगभाव आणि समाज या विषयावर त्यांनी केलेले कार्य विशेष उल्लेखनीय आहे. स्त्री-पुरुष समानता ही केवळ कायदेशीर तरतुदींमध्ये मर्यादित न राहता ती सामाजिक व्यवहारात कशी प्रकट होते, याचा त्यांनी सखोल अभ्यास केला. महिलांवरील हिंसाचार, कौटुंबिक नातेसंबंध, कामगार क्षेत्रातील महिलांची स्थिती आणि दारूबंदी चळवळीत महिलांची भूमिका अशा विषयांवरील त्यांच्या संशोधनातून लिंगभाव असमानतेची संरचनात्मक कारणे स्पष्ट झाली आहेत. त्यांच्या लेखनात स्त्री ही केवळ अभ्यासविषय न राहता सामाजिक परिवर्तनाची सक्रिय घटक म्हणून समोर आली आहे.वृद्धत्वाचे समाजशास्त्र हा त्यांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा आयाम आहे. बदलत्या कुटुंबव्यवस्थेमुळे वृद्धांच्या जीवनावर होणारे परिणाम, वृद्धाश्रमांची वाढ, वृद्धांचे सामाजिक-मानसिक प्रश्न आणि कौटुंबिक आधाराचा अभाव या विषयांवरील त्यांच्या संशोधनाने वृद्धत्वाच्या प्रश्नांकडे समाजाचे लक्ष वेधले. वृद्ध ही केवळ कल्याणकारी योजनांची लक्ष्यगट नसून सन्मानाने जगण्याचा हक्क असलेली व्यक्ती आहे, ही भूमिका त्यांच्या संशोधनातून ठळकपणे व्यक्त झाली आहे.संशोधन मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. एम. ए., एम.फिल. आणि पीएच.डी., आणि पोस्ट-डॉक्टोरेट (पी.डी.एफ.) स्तरावर त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. या संशोधन प्रबंधांचे विषय पाहिले, तर समाजातील विविध घटकांचे जीवनविश्व उलगडताना दिसते. दलित व मागासवर्गीय समाज, आदिवासी समुदाय, कामगार, महिला, वृद्ध, अपंग, विधीसंघार्षित बालके, पोलीस व्यवस्था, स्वयं-सहायता गट आणि विस्थापित लोकसंख्या इत्यादी. या संशोधनातून समाजातील संरचनात्मक विषमता, सामाजिक नियंत्रण आणि बदलत्या सामाजिक मूल्यांचे विश्लेषण झाले.प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांचे पोस्ट-डॉक्टोरेट (पी.डी.एफ.) संशोधनासाठी डॉ. राजेंद्र बगाटे यांना अनमोल मार्गदर्शन लाभले आहे, तर पीएच.डी. पदवी संशोधनासाठी डॉ. ए.डी. साबळे, डॉ. डी.एस. कोरे, डॉ. स्नेहलता मानकर, डॉ. नारायण बोराडे, डॉ. सुनिता अंकुश (वाघमारे), डॉ. डी.डी. घोडगे, डॉ. डी.एल. तोरवणे, डॉ. अरुंधती पाटील, डॉ. प्रशांत सोनवणे, डॉ. शिवकुमार सोळंके, डॉ. शोभा इंगळे, डॉ. राजेंद्र बगाटे, डॉ. आरती धनवे, डॉ. मंगलमुर्ती धोकटे, डॉ. संदीप चौधरी, डॉ. रुपसी दास, डॉ. गणेश मोकासरे, डॉ. रेवणनाथ काळे, डॉ. अंबिका दत्ता, डॉ. वैशाली जाधव, सुजाता पाटील आणि सविता कोटूरी इत्यादी संशोधकांना अनमोल मार्गदर्शन लाभले आणि लाभत आहे. तसेच अनेक माझ्यासह अनेक विद्यार्थ्यांना एम.फिल. पदवीसाठी अनमोल मार्गदर्शन लाभले आणि लाभत आहे. मार्गदर्शन करताना त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ तांत्रिक सूचना दिल्या नाहीत, तर संशोधनातील नैतिकता आणि सामाजिक जबाबदारीचे भान दिले. माहिती संकलन करताना प्रतिसादकर्त्यांचा सन्मान, निष्कर्ष मांडताना वस्तुनिष्ठता आणि निष्कर्षांचा समाजासाठी होणारा उपयोग या बाबींवर त्यांनी विशेष भर दिला आहे. त्यामुळे त्यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेले संशोधन केवळ विद्यापीठीय निकष पूर्ण करणारे न राहता समाजोपयोगी ठरत आहे.पोस्ट-डॉक्टोरल (पी.डी.एफ.) संशोधन मार्गदर्शन हे प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांच्या शैक्षणिक कार्याचे वैशिष्ट्यपूर्ण अंग आहे. इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च (आय.सी.एस.एस.आर.), नवी दिल्ली अंतर्गत त्यांनी पोस्ट-डॉक्टोरल (पी.डी.एफ.) संशोधनासाठी डॉ. राजेंद्र बगाटे यांना “प्रॉब्लेम्स ऑफ एल्डरली लिविंग इन ओल्ड एज होम्स इन महाराष्ट्रा’ या वृद्धांशी संबंधित संशोधन विषयावर मार्गदर्शन केले आहे. महाराष्ट्रात समाजशास्त्र विषयातील पहिल्या पोस्ट-डॉक्टोरल संशोधनाची परंपरा घडवण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. वृद्धाश्रमातील वृद्धांचे सामाजिक, आर्थिक आणि मानसिक प्रश्न, त्यांची सामाजिक-मानसिक अवस्था, कौटुंबिक नात्यांतील बदल, कौटुंबिक आधाराचा अभाव आणि सामाजिक प्रतिष्ठेचे प्रश्न या विषयावर झालेल्या पोस्ट-डॉक्टोरल संशोधनातून समाजधोरणांसाठी उपयुक्त निष्कर्ष पुढे आले आहेत.ग्रंथनिर्मिती आणि लेखन हे त्यांच्या शैक्षणिक योगदानाचे महत्त्वाचे साधन राहिले आहे. समाजशास्त्रीय संज्ञा, स्वयं-सहायता गट आणि लिंगभाव समता यांसारख्या विषयांवरील त्यांची पुस्तके विद्यार्थ्यांसाठी आणि संशोधकांसाठी मार्गदर्शक ठरली. मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांत त्यांनी लेखन केले असून, त्यामुळे स्थानिक सामाजिक प्रश्नांची मांडणी व्यापक शैक्षणिक वर्तुळात पोहोचली आहे. संशोधन नियतकालिके, संपादित ग्रंथ आणि परिषद कार्यवृत्तांमधील त्यांचे लेख समाजशास्त्रीय चर्चेला दिशा देणारे ठरले आहेत.राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमधील सहभागाने त्यांच्या कार्याला व्यापक परिमाण लाभले. वृद्धत्व, लिंगभाव असमानता, विश्रांतीकालीन जीवन आणि सामाजिक विकास अशा विषयांवरील शोधनिबंध त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर सादर केले. या अनुभवांचा लाभ त्यांच्या अध्यापन आणि संशोधनात झाला आणि भारतीय समाजातील प्रश्नांचे जागतिक समाजशास्त्रीय चौकटीत विश्लेषण शक्य झाले.समाजशास्त्र हे केवळ अकादमिक क्षेत्रापुरते मर्यादित नसून ते सामाजिक कृतीशी जोडलेले असावे, हा विश्वास त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिला. महिला संघटना, महिला सुरक्षा समित्या, जनशिक्षण संस्थान आणि ग्राहक चळवळीतील सहभागातून त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली. संशोधनातून निष्पन्न झालेले निष्कर्ष समाजकार्याच्या माध्यमातून प्रत्यक्ष समाजात उतरवण्याचा त्यांचा प्रयत्न सातत्याने दिसतो.विद्यापीठीय प्रशासन आणि शिक्षक संघटनांमध्येही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. अनेक वर्ष त्या समाजशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख राहिल्या असून त्यांनी विद्यापीठांमध्ये अधिसभा सदस्यासह अनेक महत्वपूर्ण पदांवर काम केले आहे. या पदांवर असतांना त्यांनी विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी यापैकी कुणालाही त्रास दिलेला नाही, तर प्रत्येकाच्या अडचणी समजून घेवून त्या सोडवल्या आहेत आणि आज पण सोडवत आहेत. शिक्षक संघटनेतील जबाबदाऱ्या पार पाडताना त्यांनी शैक्षणिक लोकशाही, पारदर्शकता आणि सहकार्य या मूल्यांचा पुरस्कार केला. सहकारी आणि कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांसाठी त्या नेहमीच मार्गदर्शक आणि प्रेरणास्थान राहिल्या आहेत.प्रा. डॉ. स्मिता अवचार यांच्या कार्याचे सर्वात प्रभावी प्रतिबिंब म्हणजे गुरू-शिष्य परंपरा होय. गुरू म्हणून त्यांनी अधिकार गाजवण्याऐवजी विश्वास निर्माण केला. संशोधनातील अडचणी, क्षेत्रकार्याचे अनुभव आणि सैद्धांतिक संभ्रम या सर्व बाबींवर त्यांनी संयमाने मार्गदर्शन केले. त्यामुळेच त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये केवळ संशोधक नव्हे, तर सामाजिकदृष्ट्या जागरूक माणसे घडली आहेत.या संदर्भात माझा म्हणजेच डॉ. राजेंद्र बगाटे यांचा वैयक्तिक अनुभव विशेष उल्लेखनीय ठरतो. एम.ए., नेट-जेआरएफ, एम.फिल., पीएच.डी. आणि पोस्ट-डॉक्टोरेट (पी.डी.एफ.) संशोधन या सर्व शैक्षणिक टप्प्यांवर एकाच गुरूच्या मार्गदर्शनाखाली घडणे ही दुर्मीळ बाब आहे. या संपूर्ण प्रवासात प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांनी केवळ संशोधनविषयक मार्गदर्शन केले नाही, तर शैक्षणिक प्रामाणिकपणा, सामाजिक संवेदनशीलता आणि माणुसकीची मूल्ये रुजवली आहेत. संशोधन म्हणजे केवळ पदवी मिळवणे नसून समाजासाठी काहीतरी देण्याची जबाबदारी आहे, ही शिकवण त्यांच्या मार्गदर्शनातून मिळाली आहे.प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांना देण्यात आलेल्या जीवन गौरव पुरस्काराचे महत्त्व या सर्व पार्श्वभूमीवर अधिक खोलवर समजते. हा पुरस्कार म्हणजे प्रदीर्घ सेवेला दिलेला सन्मान असला, तरी तो समाजशास्त्र या विषयाच्या सामाजिक उपयोगितेची सार्वजनिक कबुली आहे. समाजातील दुर्बल घटकांचे प्रश्न, महिलांचे सक्षमीकरण, वृद्धांचे सन्मानजनक जीवन आणि विकासातील मानवी पैलू या सर्व विषयांना शास्त्रीय अधिष्ठान देण्याचे कार्य त्यांनी आयुष्यभर केले. त्याचीच ही औपचारिक पावती आहे.समारोप करताना असे म्हणावे लागेल की, प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम यांना प्रदान करण्यात आलेला जीवन गौरव पुरस्कार हा त्यांच्या वैयक्तिक यशाचा क्षण असला, तरी तो महाराष्ट्रासह भारतातील समाजशास्त्र क्षेत्रासाठी अभिमानाचा क्षण आहे. समाजशास्त्राच्या माध्यमातून समाज अधिक समताधिष्ठित, संवेदनशील आणि न्याय्य व्हावा, या उद्देशाने त्यांनी जे कार्य केले, त्याची दखल या पुरस्कारातून घेतली गेली आहे. त्यांच्या ज्ञानाने, मार्गदर्शनाने आणि मूल्यांनी घडलेली पिढी हीच त्यांच्या कार्याची खरी ओळख आहे. समाजशास्त्राच्या सेवाव्रताचा हा प्रवास दीर्घकाळ प्रेरणादायी ठरो, हीच मनःपूर्वक सदिच्छा.

**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, प्रा. डॉ. स्मिता अवचार मॅडम**
यांचे एम.ए., नेट-जेआरएफ, एम.फिल.,
पीएच.डी. आणि पोस्ट-डॉक्टोरेट (पी.डी.एफ.)चे
विद्यार्थी आहेत)
ईमेल – bagate.rajendra5@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २४ फेब्रुवारी २०२६


## पाण्याचा ताळेबंद शाश्वत जीवनाची गरज - जलतज्ज्ञ सचिन सूर्यवंशी



**उमरगा :** 'पाणी हे सजीवाची मूलभूत गरज असून पुढील पिढीच्या अस्तित्वासाठी त्याचे जतन करणे आणि पाण्याचे व्यवस्थित नियोजन करून ताळेबंद करणे आवश्यक आहे. यासाठी सर्व ग्रामस्थांनी पुढाकार घ्यावा.' असे आव्हान प्रसिद्ध जल व भूमी तज्ञ सचिन सूर्यवंशी यांनी केले. ते रविवार दिनांक २२ फेब्रुवारी रोजी मौजे व्हंताळ येथे उमरगा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरातील आयोजित केलेल्या बौद्धिक सत्रात बोलत होते. कार्यक्रमासाठी श्री. प्रभाकर पाटील चेअरमन, श्री. सुरेश मरगळे, ज्ञानप्रबोधिनी हराळी, डॉ. सुर्यकांत राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ. सूर्यकांत राठोड यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. पृथ्वीवरील जलस्त्रोत आणि मातीच्या आरोग्यासंदर्भात उपस्थितांना माहिती दिली. तसेच पारंपारिक जलस्त्रोतांचे संवर्धनासाठी सांडपाण्याचे रुपांतर शोष खड्ड्यांच्या माध्यमाद्वारे संवर्धन करून जलस्त्रोत वाढवणे गरजेचे आहे तर पुढच्या पिढीला पाण्याची कमतरता भासणार नाही असे सविस्तर मत व्यक्त केले. या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. भरत शेळके, डॉ. अनिल देशमुख, प्रा. मुरलीधर जाधव, डॉ राजेंद्र सूर्यवंशी, डॉ. अतुल बिराजदार, डॉ. सुर्यकांत राठोड , डॉ. प्रेम चव्हाण ,राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिरार्थी स्वयंसेवक, गावातील प्रतिष्ठित नागरिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रज्वल चव्हाण याने तर आभार अर्जुन जाधव यांनी केले.

## कनिष्ठ महाविद्यालयीन समाजशास्त्र परिषदेकडून सेवानिवृत्त प्राध्यापकांचा गौरव

**छत्रपती संभाजीनगर : (प्रतिनिधी)** कनिष्ठ महाविद्यालयीन समाजशास्त्र परिषद, छत्रपती संभाजीनगर विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५—२६ निमित्त फेब्रुवारी २०२७ पूर्वी सेवानिवृत्त होणाऱ्या समाजशास्त्र विषयातील प्राध्यापकांचा जाहीर सत्कार सोहळा आयोजित करण्यात येणार आहे. समाजशास्त्र विषयाच्या अध्यापनातून दीर्घकाळ विद्यार्थ्यांच्या बौद्धिक आणि सामाजिक घडणीत मोलाचे योगदान देणाऱ्या प्राध्यापकांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. तसेच बोर्डामध्ये एक्झामिनर व मॉडरेटर म्हणूनही महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. या सर्व शैक्षणिक आणि प्रशासकीय कार्याची दखल घेऊन दरवर्षीप्रमाणे याही वर्षी छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळात मान्यवरांच्या उपस्थितीत हा सन्मान सोहळा पार पडणार आहे.सत्कारामध्ये मानपत्र, शॉल, पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन संबंधित प्राध्यापकांचा सन्मान करण्यात येणार आहे. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या सर्मपित सेवेला कृतज्ञ अभिवादन करण्याचा परिषदेकडून हा प्रयत्न असल्याचे कळविण्यात आले आहे.फेब्रुवारी, २०२७ पर्यंत सेवानिवृत्त होणाऱ्या समाजशास्त्र विषयातील सर्व प्राध्यापकांनी आपली नावे व आवश्यक माहिती परिषदेच्या पदाधिकाऱ्यांकडे लवकरात लवकर नोंदवावी, असे आवाहन राज्याध्यक्ष - डॉ. प्रकाश खेत्री, सचिव - डॉ. हेमंत सोनकांबळे, उपाध्यक्ष - डॉ. श्रीकांत पारखी कोषाध्यक्ष - डॉ.व्यंकटेश खरात, कार्याध्यक्ष- डॉ. सुनील शिंदे तसेच छत्रपती संभाजीनगर विभागीय अध्यक्ष प्रा.राजेंद्र सूर्यवंशी - ९८२२२६६१५५, उपाध्यक्ष - प्रा. सीमा औटे-९८२२९१११९६, सचिव प्रा. ज्ञानेश्वर घुले - ९८५०८०२०२२, कार्याध्यक्ष डॉ. रामनाथ पवार - ९४२२२४३९०५, प्रा. सहदेव गावंडे ,डॉ. विजयकुमार रोडे, डॉ.विद्या भिल्लारे, प्रा. नारायण राऊत, प्रा भारत जाधव, प्रा.तुळशीराम शेवाळे, प्रा.किशोर गुनावत, प्रा.अनिल डाके, प्रा. सुनील भोज, प्रा. नवनाथ कांबळे, प्रा. सतीश जाधव, प्रा.राजेंद्र राऊत, प्रा. गोपीचंद घायतिडक,प्रा. सविता पोकळे, प्रा. शरद खिल्लारे, प्रा.संतोष राठोड, प्रा. निवृत्ती लहाने, प्रा. प्रवीण लहाने, प्रा. गोविंद लहाने आदींकडून करण्यात आले आहे. समाजशास्त्र विषयाच्या क्षेत्रातील कार्याचा गौरव करण्याची ही महत्त्वपूर्ण संधी असून संबंधितांनी या उपक्रमास प्रतिसाद द्यावा, असेही परिषदेकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## विशाल तायडे यांच्या 'ढ' बालकादंबरीस पुरस्कार




**छत्रपती संभाजीनगर :** प्रसिद्ध बालसाहित्यिक विशाल तायडे यांनी लिहिलेल्या 'ढ' या बाल कादंबरीस दुसऱ्या राज्यस्तरीय अधिकारी मराठी साहित्य संमेलनात उल्लेखनीय साहित्य कृती म्हणून गौरवण्यात आले. पुणे येथे बालगंधर्व रंगमंदिरात झालेल्या या संमेलनात तेलंगणा राज्याचे अतिरिक्त पोलीस महासंचालक तथा संमेलन अध्यक्ष श्री महेश भागवत यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. याप्रसंगी मंचावर यशदाचे उपमहासंचालक शेखर गायकवाड, अतिरिक्त जिल्हाधिकारी राजीव नंदकर, यशदाच्या संचालक डॉ. किरण धांडे, सुनील महाजन आदी मान्यवर उपस्थित होते. या आधी 'ढ' या बालकादंबरीस छत्रपती संभाजीनगर येथील शिवार प्रतिष्ठानचा संदीप दळवी बाल साहित्य पुरस्कार प्राप्त झालेला आहे. बालकांच्या शिक्षणाकडे आणि गुणवत्तेकडे वेगळ्या दृष्टीने या बाल कादंबरीत विचार मांडलेला आहे. विशाल तायडे यांच्या यशाबद्दल डॉ. जिजा शिंदे, डॉ. राजेश चौधरी, डॉ. रवी जाधव, डॉ. सोहेल झकिउद्दीन, नागेश डुकरे यांनी अभिनंदन केले आहे.

## जागतिक व्यासपीठावर माईसाहेब चित्रपटाची ; इंडियन वर्ल्ड फिल्म फेस्टिव्हलमध्ये अधिकृत निवड




**छत्रपती संभाजीनगर :** येथील अवलोकितेश्वर प्रॉडक्शन्स निर्मित "माईसाहेब डॉ. सविता भीमराव आंबेडकर" या चित्रपटाची १० व्या इंडियन वर्ल्ड फिल्म फेस्टिव्हलमध्ये अधिकृत निवड झाली आहे. हा महोत्सव दिनांक ७ मार्च २०२६ रोजी हैद्राबाद येथील हॉटेल बेस्ट वेस्टर्न अशोका येथे आयोजित करण्यात येणार आहे.प्रकाश त्रिभुवन दिग्दर्शित व निर्मित हा चरित्रपट डॉ. सविता भीमराव आंबेडकर (माईसाहेब) यांच्या जीवनकार्यावर आधारित असून त्यांच्या सामाजिक योगदानाचा सखोल वेध घेतो.या चित्रपटाला यापूर्वीही अनेक मानाचे सन्मान प्राप्त झाले आहेत. कान्स वर्ल्ड फिल्म फेस्टिव्हलमध्ये "सर्वोत्कृष्ट भारतीय चित्रपट" हा पुरस्कार, अंबरनाथ मराठी चित्रपट महोत्सवामध्ये "उत्कृष्ट वेशभूषा" पुरस्कार तसेच गोवा इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलमध्ये प्रीमियर सन्मान असे विविध पुरस्कार या चित्रपटाला मिळाले आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळालेल्या या गौरवामुळे चित्रपट क्षेत्रात तसेच समाजात अभिमानाची भावना व्यक्त होत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २४ फेब्रुवारी २०२६


## वय सहाच, पण जिद्द अफाट! जळगावच्या अदयान सालारचा पहिला रोजा पूर्ण



**जळगाव :** रमजानच्या पवित्र पर्वात जळगाव येथील अवघ्या ६ वर्षीय चिमुकल्या अदयान शहबाज सालार याने आपला पहिला रोजा अत्यंत जिद्दीने पूर्ण करून सर्वांची मने जिंकली आहेत.कडक ऊन आणि तहान-भूकेची तमा न बाळगता, पहाटे सहरीपासून ते सायंकाळी इफ्तारपर्यंत अदयानने मोठ्या धैर्याने हा उपवास पाळला.त्याच्या या चिकाटीमुळे घरात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, इफ्तारच्या वेळी कुटुंबीयांनी त्याचे लाड पुरवत त्याच्या आवडीचे पदार्थ तयार केले आणि त्याला विशेष भेटवस्तू देऊन गौरवण्यात आले.अदयानचे वडील शहबाज सालार यांनी आपल्या मुलाच्या या धार्मिक ओढीबद्दल अभिमान व्यक्त केला असून, सोशल मीडियावरही या 'छोट्या हिरो'च्या हिंमतीचे आणि संस्मरणीय कामगिरीचे मोठ्या प्रमाणावर कौतुक होत आहे.






# 'घृष्णेश्वर 'च्या दहावीच्या बॅचचा स्नेहमेळावा



**दौलताबाद (जावेद अहमद) :** खुलताबाद येथील घृष्णेश्वर विद्यालयात दहावीच्या जुन्या बॅचचा स्नेहमेळावा नुकताच पार पडला. ३८ वर्षानंतर पुन्हा एकदा विद्यार्थ्यांची शाळा भरली. घृष्णेश्वर विद्यालयाचे १९८७-१९८८ च्या बॅचचे विद्यार्थी स्नेहमेळाव्यानिमित्त दौलताबाद येथे एकत्र आले. सर्वप्रथम दिवंगत शिक्षक, विद्यार्थी मित्रांना श्रद्धांजली वर्गमित्र यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यानंतर ३८ वर्षात वैयक्तिक जीवनात आलेल्या चांगल्या-वाईट गोष्टींचा उहापोह सर्वांनी मनोगतातून व्यक्त केला. शालेय जीवनातील आठवणींनाही उजाळा दिला. स्नेहभोजनानंतर विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमातुन अनेकांनी आपल्या कला सादर केल्या. 'अंताक्षरी' ने अजून कार्यक्रमात रंगत वाढली. शेवटी निरोपाची वेळ आली. लवकर भेटण्याचा संकल्प करून कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी शिक्षक खेरणार यांची प्रमुख उपस्थिती होती. स्नेहमेळावा यशस्वीतेसाठी अप्पाराव देवतकर, सुरेश वाघ,विजय दांडेकर दिनेश सावजी प्रयत्न केले. यावेळी विद्यार्थी माजी उपनगराध्यक्ष सुरेश मरकड, नगरसेवक अनिस जाहगीरदार, नयना भावसार, मीरा नागे, फौजिया शेख,सुनीता लहाने, संगीता गंगावणे, कुंदा नागे, साधना बोडखे, सुदाम खोसरे, धनंजय तनखेदार, संजय वरकड,बापूराव कांजूने, अशोक जाधव,संजय मरकड, लक्ष्मण राठोड, विश्वजित जुनागडे, नितीन कोल्हे, सुरेश काळे,देवानंद बोडखे, विलास नरवडे, कारभारी गायके, रामदास निमोणे, बबन सोनवणे, ज्ञानेश्वर फुलारे, रतन कसारे, मदन श्रीसागर, संतोष सावजी, अशोक सोनवणे, रोहिदास जाधव, जावेद शेख आदींची प्रमुख उपस्थिती होती

# दगडोजीराव देशमुख महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन


**छत्रपती संभाजीनगर :** वाळूज एम. आय. डी. सी. परिसरातील दगडोजीराव देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चिश्तिया कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खुलताबाद आणि राजर्षी शाहू कला व विज्ञान महाविद्यालय, मराठी विभागाच्या वतीने संयुक्तपणे "महानुभाव- वारकरी संप्रदाय : वैचारिक अनुबंध आणि वर्तमान" या विषयावर २५ फेब्रुवारी २०२६ रोजी एक दिवशीय राष्ट्रीय ज्ञानसत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या ज्ञानसत्राचे उद्घाटन संत साहित्याचे अभ्यासक (आय. ए. एस.) ह. भ. प. डॉ. विजयकुमार फड यांच्या शुभहस्ते होणार आहे, तर या राष्ट्रीय ज्ञानसत्राचे बीजभाषक संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. सतीश बडवे हे करणार आहेत. या ज्ञानसत्रासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागातील विद्यापीठाचे प्राध्यापक, विद्यार्थी कल्याणचे संचालक डॉ. कैलास अंभुरे हे असणार आहेत. कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थितीमध्ये विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता डॉ. विजयभाऊ पाथ्रीकर हे असणार आहेत. पहिल्या उद्घाटन ज्ञानसत्रामध्ये 'महानुभाव वारकरी यांच्यातील अनुबंध' या विषयावर डॉ. विजयकुमार फड हे भाष्य करणार आहेत. तर 'महानुभाव- वारकरी संप्रदाय : वैचारिक अनुबंध आणि वर्तमान' या विषयावर डॉ. सतीश बडवे हे भाष्य करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दगडोजीराव देशमुख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल हजारे हे असणार आहेत. प्रमुख उपस्थितीमध्ये श्री. विजय राऊत, श्रीमती शिवानी राऊत हे असणार आहेत. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुभाष बागल हे करणार आहेत. सूत्रसंचालन डॉ. नागेश बोन्तेवाड करणार आहेत. तर आभार डॉ. युवराज धबडगे हे करणार करणार आहेत. दुसऱ्या बौद्धिकसत्रामध्ये संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सुभाष बागल लिखित व बहुचर्चित ग्रंथ 'संत तुकारामांचे अभंग : एक चिंतन' आणि 'महानुभाव : तत्त्वविचार आणि मूल्यदृष्टी' या ग्रंथावर परिसंवाद होणार आहे. या बौद्धिकसत्राच्या अध्यक्षस्थानी नांदेड येथील महानुभाव व संत साहित्याचे अभ्यासक डॉ. संजय जगताप हे असणार आहेत. 'संत तुकारामांचे अभंग : एक चिंतनष या ग्रंथावर संत साहित्याच्या अभ्यासक, लासू दादार स्टेशन येथील डॉ. न. ब. कदम हे भाष्य करणार आहेत. तर 'महानुभाव : तत्त्वविचार आणि मूल्यदृष्टी' या ग्रंथावर महानुभाव साहित्याचे अभ्यासक प्रा. चक्रधर कोठी ( ऋद्धिपुर) हे भाष्य करणार आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रमेश औताडे हे करणार आहेत. तर आभार डॉ. दैवत सावंत हे करणार आहेत. या बौद्धिक अनुमोदक डॉ. दत्ता शिंदे ( परभणी ) हे तर चर्चक डॉ. शिवाजी हुसे हे असणार आहेत. तिसऱ्या बौद्धिक सत्राचे सत्राध्यक्ष म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील महानुभाव अध्यासनाचे समन्वयक महंत डॉ. सोनपेठकर हे असणार आहेत. या बौद्धिकसत्रामध्ये साधन व्यक्ती म्हणून महानुभाव साहित्याचे अभ्यास प्रा. संदीप तडस, अमरावती, संत साहित्याचे अभ्यासक डॉ. दत्तात्रेय डुंबरे, छत्रपती संभाजीनगर, मराठी अभ्यास मंडळाचे चेअरमन डॉ. सर्जेराव जिगे आणि चांदवड येथील डॉ. तुषार चांदवडकर यांचा सहभाग असणार आहे. चर्चक म्हणून डॉ. दिलीप बिरुटे तर अनुमोदक म्हणून डॉ. बाळासाहेब लिहिणार असणार आहेत. सूत्रसंचालन डॉ. सुखदेव पोटदुखे तर आभार डॉ. रेखा वाघ करणार आहेत. या ज्ञान सत्राच्या समारोप सत्रामध्ये पाहुणे म्हणून प्रमुख ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज बंडगर, सोलापूर हे असणार आहेत. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. अशोक हजारे, अर्थतज्ञ डॉ. डी एस काटे, प्राचार्य आर. टी. देशमुख, ह. भ. प. डॉ. प्रमोद कुमावत, प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे हे असणार आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब लिहिणार करणार आहेत. तर आभार डॉ. नवनाथ गोरे हे करणार आहेत. या राष्ट्रीय ज्ञानसत्रासाठी आपण मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन प्राचार्य डॉ. निशिकांत आलटे, प्राचार्य डॉ. सय्यद असिफ झकेरीया, डॉ. सुभाष बागल, डॉ. युवराज दबडगे, डॉ. रेखा वाघ, डॉ. मोहन सौंदर्य, डॉ. नागेश बोन्तेवाड, डॉ. अर्शिया कादरी यांनी केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २४ फेब्रुवारी २०२६

## जिंतूर तालुक्यात मटक्याने डोके वर काढले, मोक्याच्या ठिकाणी होतो मटक्याचा धंदा




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** तालुक्यात मटका जुगार सुरू झाले असून त्यात जिंतूर शहरातील मुख्य ठिकाणीही मटका जुगाराचो अड्डे दिसून येत आहे. चारठाणा, येलदरी कॅम्प, बामणी, भोगाव तसेच शहरातील मध्यवर्ती भागात सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत लाखोंची उलाढाल होत असल्याची चर्चा नागरिकात होत असुन या मटक्यामुळे अनेकांचे संसार उध्वस्त होत असून पोलीस प्रशासन व गुन्हे शाखा या मटकाचालकावर कारवाई करणार का ? असा सवाल उपस्थित होतांना दिसून येतो.कल्याण, मिलन, श्रीदेवी, टाइम्स बाजार या नावाची छापील बुक कार्बन कॉपी पावत्या रबर स्टॅम्प आणि मोबाईल द्वारे आकडे स्वीकारण्याची पद्धत सुरू आहे. शहरातील पशुवैद्यकीय रुग्णालय परिसर, वरुड रोड, येलदरी रोड, बस स्टँड परिसर, जिल्हा परिषद शाळा कंपाऊंड, शिवाजी चौक, ज्येष्ठ नागरिक सहायता कक्ष, गणपतीमंदीर परिसर आदी सारख्या मध्यवर्ती भागातही अड्डे सुरू असल्याची चर्चा आहे. सर्वसामान्यांना याबद्दल माहिती असेल तर पोलीस यंत्रणा व गुन्हे शाखेंना यांची माहिती का नाही? असा सवाल उपस्थित होतांना दिसतो. अनेक नागरिक कष्टाचे पैसे या जुगारात गमावत आहेत. त्यामुळे अनेक कुटुंबे उध्वस्त होत असून जिंतूर मध्ये कायद्यांचा धाक राहिला की नाही? असा प्रश्न खुल्या मटका सुरू असल्याने उपस्थित होतांना दिसतो या प्रकरणी वरिष्ठ पातळीवरून कारवाई करण्यात यावी अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. वरिष्ठ पोलीस अधिकारी व गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी यांची गांभीर्याने दखल घेऊन कारवाई करतात का याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## कर्मकांडावर गाडगेबाबा प्रचंड प्रहार करत : डॉ. बाळासाहेब लिहिणार

**करमाड :** राजीव गांधी कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय करमाड येथे समाज शास्त्र विभागाच्या वतीने आज संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मराठी विभाग प्रमुख डॉ. बाळासाहेब लिहिणार यांचे 'संत गाडगेबाबा यांचे जीवन व कार्य' यावर विशेष व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी डॉ. लिहिणार म्हणाले संत गाडगेबाबांनी आयुष्यभर गावो गावी जाऊन स्वच्छतेचे महत्त्व पटवून सांगितले व हे सांगत असताना गाडगेबाबा कर्मकांडावर प्रचंड प्रहार करत असत. देव दगडात नाही तर माणसात आहे, त्यामुळे माणसाने माणसावर प्रेम करायला शिकले पाहिजे असा उपदेश ते आयुष्यभर करत राहिले. येथील दिन दलित शोषित पीडित कष्टकरी यांच्या मुलांसाठी त्यांनी वस्तीग्रह काढले, धर्मशाळा काढल्या. आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याकडे आपले वसतिगृह व धर्मशाळा सोपवून निवृत्त होण्याचे ठरविले आणि २० डिसेंबर १९५६ ला संत गाडगेबाबा यांचे निधन झाले.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव मुळे होते त्यांनी संत गाडगेबाबांच्या सत्कर्म यावर प्रकाश टाकला यावेळी समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. लक्ष्मण दांडगे यांनी प्रस्ताविक केले तर प्रा.तन्मय भावसार यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. नानासाहेब लावंड यानी आभार मांडले.या कार्यक्रमासाठी डॉ.नरेश डहाळे,डॉ. कालिदास फड, प्रा.रामदास घोडके, डॉ. सुखदेव पोटदुखे, डॉ.ललित गोल्डे , डॉ.रमेश कचरे, डॉ. किशोर काळे, डॉ.शिंदे,डॉ.नितीन मुळे, डॉ मोरे, प्रा. हरिदास होळकर, प्रा. प्रशांत माठे, प्रा. लक्ष्मण खरात डॉ. इम्रान पठाण, कैलास जाधव, भगवंत देशपांडे मधुकर राठोड, ज्ञानेश्वर जाधव आदींनी परिश्रम घेतले.

## "सेवा, ज्ञान, विज्ञानाची संस्कृती विकसित करणे हीच खरी गाडगेबाबांना आदरांजली"- डॉ. आर. व्ही. मस्के










**छत्रपती संभाजीनगर :** "केवळ परिसर स्वच्छता एवढाच विचार न करता अंधश्रद्धा, अनाचार, व्यसनाधिनता, कर्जबाजारीपणा, शिक्षण, तीर्थ, देवदैवते, नवस, धर्मदाय दवाखाने,अन्नछत्रे अशा वैज्ञानिक व वैचारिक क्षेत्रासह सेवा ज्ञान विज्ञानाची संस्कृती विकसित करणे हीच खरी गाडगेबाबांना आदरांजली ठरेल"- असे विचार प्राचार्य डॉ.आर.व्ही. मस्के यांनी व्यक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात कर्मयोगी वैज्ञानिक संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त विशेष श्रमदान, स्वच्छता मोहीम राबवून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. प्रारंभी उपप्राचार्य प्रा.एन.एम. करडे,डॉ. नवनाथ गोरे,डॉ.गौ तम घाडगे, वर्षा आठवले,मीना कचरे,करण वानखडे, शिवम सोनोने, निखिल तायडे, समाधान धाबे यांनी परिसर स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नवनाथ गोरे यांनी केले,यावेळी उपप्राचार्य प्रा. एन.एम. करडे, डॉ. बी. एन. शिंदे, डॉ.एस.पी. खिल्लारे यांनी मनोगत व्यक्त केले.शेवटी अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. आर. व्ही.मस्के यांनी केला. यावेळी डॉ. राहूल मोरे, अधिक्षक राजू पट्टेकर यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमास सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गौतम घाडगे यांनी तर आभार डॉ. राजू वानखेडे यांनी व्यक्त केले.

## विद्यार्थी तनावमुक्तीसाठी एकपात्री सांस्कृतिक कार्यक्रम



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** संभाजीनगर जिल्ह्यातील ७४ जळगाव येथील जिल्हा परीषद शाळेत २३ फेब्रुवारी सोमवार रोजी " मुले रंगली काव्यात " हा एकपात्री धमाल विनोदी कार्यक्रम बाल कवी अय्युब पठाण लोहगावकर यांनी सादर करून विद्यार्थी यांची मने जिंकली. या कार्यक्रमात अय्युब पठाण यांनी देशभक्तीपर गीते, भारूड, पोवाडा,विनोदी पाळणे,हुंडाबंदी, कॉपी मुक्त अभियान गीत, आणि शेवटी आई ही कविता मधूर सुरात गाऊन अक्षरशा: उपस्थित विद्यार्थी रडले. आणि या कार्यक्रमाने सर्व उपस्थितांना खिळवून ठेवले.विद्यार्थी यांच्या आगामी होणाऱ्या वार्षिक परीक्षेचा तान-तनाव कमी व्हावे या हेतूने हा सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पैठण कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती रामपाटील एरंडे होते. तसेच कार्यक्रमास शालेय समितीच्या अध्यक्षा सीमा बजारे, उपसरपंच ऋतुजा एरंडे, दत्तु सुक्रे, शिक्षक अमोल एरंडे, बाबासाहेब मुळे, नारायण सोनवणे, बद्रीनाथ गटकळ, हरिभाऊ घेगडे, कृष्णा नारळकर, बिहारी पाठे, भाऊसाहेब जगधने यांच्यासह शाळेतील शिक्षक-शिक्षिका परिसरातील पालकवर्ग व शाळेतील विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. शेवटी कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २४ फेब्रुवारी २०२६


## परभणी जिल्हातील निढावलेल्या नोकरशहांना सरकारचा लगाम

**जिंतूर (बि. डी. रामपूरकर) :** परभणी जिल्ह्यासाठी नागरिकांच्या आणि विकासाच्या दृष्टीने आज अत्यंत मोठी नियुक्ती सरकारच्या वतीने करण्यात आली आहे परभणी जिल्ह्याच्या पालक सचिव पदी कार्यतत्पर प्रशासकीय अधिकारी म्हणून नावलौकिक असलेले श्री तुकाराम मुंढे आयएएस अधिकारी यांची नियुक्ती आज शासनाने जाहीर केली परंतु परभणी जिल्ह्यातील इतके निरढावलेले आहेत की ते विचार करण्यापलीकडचे आहे जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणा इतकी कोलमडलेली आहे की जनतेची अनेक कामे प्रलंबित आहेतच कोणताही अधिकारी आपला वेळ मारून नेतोय खुर्चीवर कधीच बसत नाही ही वास्तविकता आहे आणि अनेक विकास कामेही बोगस निकृष्ट दर्जाची आणि समाज हिताची नसल्याने ती पूर्ण करण्याचा अट्टाहास राज्यकर्ते करीत आसतत ठेकेदाराच्या माध्यमातून अनेक रस्ते नाव त्यांचं काम यांचं या पद्धतीने जिल्ह्यातला कारभार दिसून येतो अशा परिस्थितीमध्ये महायुती सरकारने तुकाराम मुंडे सारख्या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यास नियुक्त केल्याने खऱ्या अर्थानं पालिक पालक सचिव या माध्यमातून जिल्ह्याला न्याय मिळेल का याकडे सर्व जिल्हावासियांचे लक्ष लागले आहे पालक सचिव आणि त्यांचे कार्य आपण पाहूया व त्यांना असलेला अधिकार कोणता पालक सचिव कार्य व कर्तव्यपालक सचिव (Guardian Secretary) हे महाराष्ट्र राज्य सरकारद्वारे जिल्ह्याच्या विकासावर लक्ष ठेवण्यासाठी नियुक्त केलेले वरिष्ठ नोकरशहा असतात. ते जिल्हा प्रशासन व राज्य सरकारमधील दुवा म्हणून कार्य करतात. त्यांच्या प्रमुख कर्तव्यात जिल्हा दौऱ्यांद्वारे विकासकामांची पाहणी, योजनांची अंमलबजावणी सुनिश्चित करणे, मुख्य सचिवांना अहवाल सादर करणे आणि उत्तम काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या कार्याची शिफारस करणे यांचा समावेश होतो [२, ६, ८]. पालक सचिव: कार्य व कर्तव्येजिल्हा दौरे आणि पाहणी: नामनिर्देशित जिल्ह्यांचा दौरा करणे आणि स्थानिक पातळीवरील शासकीय कामे (उदा. तलाठी, ग्रामसेवक, भूमी अभिलेख कार्यालये) तपासणे [२].योजनांची अंमलबजावणी: राज्य आणि केंद्र सरकारच्या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होत असल्याची खात्री करणे [६].अहवाल सादर करणे: जिल्ह्यातील विकासकामांची सद्यस्थिती, प्रश्न आणि गरजांचा अहवाल राज्य शासनाच्या मुख्य सचिवांना सादर करणे [२].प्रशासकीय समन्वय: जिल्हाधिकारी आणि जिल्हा प्रशासनासोबत समन्वय साधून विकासकामांना गती देणे [७].प्रोत्साहन: जिल्ह्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रशस्तीपत्र किंवा पुरस्कार देण्याची शिफारस करणे [२].समस्या निवारण: जिल्ह्यात उद्भवलेल्या विशेष घटना किंवा समस्यांवर लक्ष ठेवून त्वरित मार्ग काढणे [२]. पालक सचिवांची ही पदे २००० पासून कार्यरत असून, त्यांचा मुख्य उद्देश प्रशासकीय गतिमानता वाढवणे हा आहे.

## बारवाले महाविद्यालयात संत गाडगेबाबा यांना अभिवादन




**जालना :** समाजातील जनतेचे सामाजिक प्रबोधन करून त्यांना विकासाकडे वाटचाल करण्यासाठी गाडगे महाराजांनी मार्ग दाखविला. गाडगे महाराज यांनी आपल्या अज्ञानी जनतेला शहाणे करण्याचा प्रयत्न केला. समाजातील अंधश्रद्धा, बुवाबाजी, उच्चनीचता, यासारख्या अनिष्ट प्रथांना त्यांनी पायबंद घातला. लोकभाषेत त्यांनी समाजाला विज्ञानाचे महत्त्व समजावून सांगितले. देव-ईश्वर यासारख्या कल्पना त्यांनी नाकारल्या. ईश्वर हा काही बाजारचा भाजीपाला नाही हे सांगून त्यांनी देव-ईश्वर हा सर्वसामान्य माणसात आपणाला दिसून येतो. म्हणून गोरगरिबांची सेवा करा, भुकेलेला अन्न द्या, मद्यपान करू नका, स्वच्छता राखा असे साधे पण अतिशय महत्त्वपूर्ण विचार त्यांनी समाजाच्या गळी उतरवले. शिक्षणाशिवाय तुमचा उद्धार नाही हेही त्यांनी सांगितलं. असे प्रतिपादन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. उद्धव थोरवे यांनी केले. संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त ते विचार व्यक्त करत होते. बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे आणि डॉ. कविता प्राशर यांनी गाडगे महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अभिजीत भुतेकर यांनी केले. यावेळी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## प्रामाणिकपणा हीच खरी संपत्ती

**मा**झ्या वर्गात इयत्ता चौथीत शिकणारी एक खूप हुशार आणि जिज्ञासू मुलगी आहे. ती नेहमी नवीन प्रश्न विचारते. एक दिवस तिने मला विचारले, “सर, प्रामाणिकपणा म्हणजे नेमके काय?” तिचा हा प्रश्न ऐकून मला खूप आनंद झाला. कारण एवढ्या लहान वयात तिला चांगल्या गुणांबद्दल जाणून घ्यायचे होते. तिच्या प्रश्नाचे उत्तर समजावून सांगण्यासाठी मी तिला एक छोटीशी गोष्ट सांगितली.एकदा एका शाळेत गौरी नावाची मुलगी शिकत होती. ती अभ्यासात चांगली होती आणि सर्वांची आवडती होती. एक दिवस सुट्टीच्या वेळी ती शाळेच्या मैदानात खेळत होती. खेळता खेळता तिला जमिनीवर एक सुंदर आणि महागडे पेन सापडले. ते पेन खूप आकर्षक होते. गौरीला ते खूप आवडले. तिच्या मनात विचार आला, “हे पेन मी माझ्याकडे ठेवले तर कुणालाही कळणार नाही. मला नवीन पेन मिळेल.” पण लगेच तिने दुसरा विचार केला. “हे पेन माझे नाही. ज्याचे आहे त्याला ते मिळाले नाही तर त्याला वाईट वाटेल.” गौरीने योग्य निर्णय घेतला. ती लगेच शिक्षकांकडे गेली आणि म्हणाली, “सर , मला मैदानात हे पेन सापडले.” शिक्षकांनी तिचे कौतुक केले आणि पेन सुरक्षित ठेवले.दुसऱ्या दिवशी एक विद्यार्थी रडत रडत शिक्षकांकडे आला. त्याचे पेन हरवले होते. शिक्षकांनी त्याला तेच पेन दिले. त्याला खूप आनंद झाला. शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांसमोर सांगितले की गौरीने प्रामाणिकपणा दाखवला आहे. सर्वांनी तिच्यासाठी टाळ्या वाजवल्या. गौरीला खूप आनंद झाला. कारण तिने योग्य आणि चांगले काम केले होते.ही गोष्ट सांगून मी विद्यार्थ्यांना समजावले की प्रामाणिकपणा म्हणजे नेहमी खरे बोलणे, फसवणूक न करणे आणि चुकीचे काम टाळणे. कोणी पाहत नसले तरी योग्य तेच करणे म्हणजे प्रामाणिकपणा. कधी कधी खरे बोलणे कठीण वाटते, पण शेवटी सत्याचाच विजय होतो. प्रामाणिक माणसावर सर्वांचा विश्वास असतो. शिक्षक, मित्र आणि कुटुंबातील लोक त्याचा आदर करतात. आयुष्यात यशस्वी व्हायचे असेल तर प्रामाणिकपणा खूप महत्त्वाचा आहे. पैसा, वस्तू किंवा बक्षीस यापेक्षा चांगले गुण अधिक मौल्यवान असतात. शेवटी मी त्या मुलीला सांगितले, “आपण नेहमी प्रामाणिक राहिले पाहिजे. कारण प्रामाणिकपणा हा माणसाचा सर्वात मोठा गुण आहे.” ती हसली आणि म्हणाली, “मी नेहमी प्रामाणिक राहीन.” तिचे ते शब्द ऐकून मला खूप समाधान वाटले. आपणही आपल्या आयुष्यात नेहमी प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न करूया.




**विठ्ठल जयवंतराव अनमुलवाड**
अभिनव विद्या विहार प्राथमिक शाळा
ता.पूर्णा, जि.परभणी.



१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002